लोकमत सोलापूर, शनिवार, दि. २५ जुलै २०१५




किर्लोस्कर उद्योग समूह व सृजन फिल्म सोसायटी यांच्या वतीने वसुंधरा महोत्सवात शुक्रवारी विद्यार्थ्यांची 'पर्यावरण दिंडी' काढण्यात आली.

# पर्यावरण दिंडी उत्साहात

## वसुंधरा महोत्सव : फिल्म फेस्टिव्हल सुरु...

सोलापूर : क्लीन सिटी, ग्रीन सिटी..., आवर सिटी स्मार्ट सिटी..., कचरा जमा होता घरोदारी..., अनारोग्य घरोघरी..., अशी घेऊ शपथ, परिसर करु कचरामुक्त..., प्लास्टिक वापर टाळा, कचऱ्याला बसेल आळा... अशा घोषणा देत शहरातील विविध शाळेच्या विद्यार्थ्यांनी गुरुवारी पर्यावरण जनजागृतीचा संदेश दिला.

किर्लोस्कर उद्योग समूह व सृजन फिल्म सोसायटी यांच्या वतीने वसुंधरा महोत्सवात शुक्रवारी विद्यार्थ्यांची 'पर्यावरण दिंडी' काढण्यात आली. चार हुतात्मा पुतळा येथून शहर उत्तर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक रवी घोडके यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी महोत्सवाचे संचालक वीरेंद्र चित्राव, समन्वयक एस.पी.वैद्य, संयोजक प्रा. नरेंद्र काटीकर, बाबुराव पेठकर, चिदानंद मुस्तारे, ऋषीकेश कुलकर्णी उपस्थित होते.

रॅली चार पुतळा येथून सरस्वती चौक, रामलाल चौक, महापौर बंगला, डफरीन चौक, डॉ. आंबेडकर चौक (पार्क चौक) मार्गे डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे विसर्जित करण्यात आली. रॅलीदरम्यान सिंहगड पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी कचऱ्याचा राक्षस तयार केला होता. विद्यार्थ्यांनी रॅलीदरम्यान कचराकुंड्या घेतल्या होत्या. रस्त्याच्या कडेला असलेला कचरा उचलून विद्यार्थी कुंडीमध्ये टाकत होते. 'शून्य कचरा' या संकल्पनेवर विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. ज्ञानप्रबोधिनी प्रशालेच्या वतीने ढोल आणि टिपरी पथकाने सुंदर सादरीकरण केले. नूतन प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी लेझीम नृत्य सादर केले. जैन गुरुकुल प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी 'शून्य कचरा' या विषयावर मूकनाट्य सादर केले. सिद्धेश्वर प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी शून्य कचऱ्याचे सादरीकरण केले. एस.व्ही.सी.एस. प्रशालेच्या वतीने ट्रॅक्टरवर हरितसेना टीम तयार करण्यात आली होती.

या रॅलीमध्ये आसावा प्रशाला, सरस्वती प्रशाला आणि मॉडर्न हायस्कूलसह १३ शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता. ही रॅली यशस्वी करण्यासाठी देदीप्य वडापूरकर, अमित राठोड, आनंद जाधव, नवलकुमार बालिंगन, मिहीर शहा आदींनी परिश्रम घेतले. (प्रतिनिधी)

### शून्य कचरा...

- विद्यार्थ्यांनी शून्य कचरा ही संकल्पना मांडत स्वत:पासून याची सुरुवात केली पाहिजे, असा संदेश रॅलीच्या माध्यमातून दिला.
- रॅलीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी वसुंधरा महोत्सवाच्या पांढऱ्या टोप्या परिधान केल्या होत्या.
- विद्यार्थ्यांनी केलेले विविध प्रतीकात्मक देखावे पाहण्यासाठी रॅली मार्गावर लोकांनी गर्दी केली होती.